ज्ञानाची राजनीती पुस्तकमाला–7

# सर्वांना ठराविक व नियमित मिळकत असावी आणि ती सरकारी कर्मचाऱ्या बरोबरी ची असावी

(मराठी अनुवाद)

लोकविद्या जन आंदोलन
विद्या आश्रम, सारनाथ, वाराणसी – 221007



ज्ञानाची राजनीती पुस्तकमाला–7

सर्वांना ठराविक व नियमित मिळकत असावी आणि ती सरकारी कर्मचाऱ्या बरोबरी ची असावी

मूळ हिन्दी : ऑगस्ट, 2014

मराठी अनुवाद : गिरीश सहस्रबुद्धे, फेब्रूवारी, 2015

मूळ प्रकाशन : लोकविद्या जन आन्दोलन करिता डॉ. चित्रा सहस्रबुद्धे

पत्ता : विद्या आश्रम, सा 10/82 ए, अशोक मार्ग, सारनाथ, वाराणसी–221007

फोन : 0542–2595120, 09839275124

अक्षर संयोजन : मुकेश बोरीकर

मुद्रक : नागपूर – 440 001

सहयोग राशी : रु. 10/–

संपर्क : लोकविद्या जन आन्दोलन
डी 1, वृत्त सृष्टि संकुल, पूर्व हायकोर्ट मार्ग,
धरमपेठ,नागपूर–440010.
फोन : 09422559348 (गिरीश)
09890336873 (विलास)
फोन : 020–27298293 (सुरेन्द्रन्, पुणे)
वेब साईट : http://vidyaashram.org,
ljamaharashtra@gmail.com
ब्लॉग : http://lokavidyajanandolan.blogspot.in

# विषय सूची


| प्रकरण | | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| 1. | लोकविद्या म्हणजे काय ? | 01 |
| 2. | विषय प्रवेश | 03 |
| 3. | देशाच्या खुशाली चे मार्ग | 05 |
| 4. | ठराविक व सरकारी कर्मचाऱ्यां बरोबरीच्या उत्पन्नाची मागणी ... | 09 |
| 5. | हे कसे घडू शकेल ? | 12 |
| 6. | या मोहिमे ची नीतिमूल्ये व लक्ष्य | 14 |
| 7. | लोकविद्या समाजाने आपल्या ज्ञानाचा दावा कसा मांडावा ? | 15 |
| | शेतकरी समाज | 15 |
| | कारागीर समाज | 19 |
| | आदिवासी समाज | 20 |
| | लहान व्यावसायिकांचा समाज | 22 |
| | महिला | 23 |
| | अन्य समुदाय | 25 |
| 8. | ज्ञान पंचायत | 28 |
| 9. | परिवर्तनाचे नवीन तत्वज्ञान | 30 |
| 10. | लोकविद्या विचार यात्रा | 34 |
| 11. | लोकविद्या जन आंदोलन मुलताई संमेलनाचे घोषणापत्र | 37 |
| 12. | लोकविद्या साहित्य सूची | 40 |
| 13. | लोकविद्या जन आंदोलन फोटो | 42 |
| 14. | सक्रिय कार्यकर्ता संपर्क सूची | 44 |




# लोकविद्या म्हणजे काय?

- समाजात लोकांकडे असलेले ज्ञान म्हणजे लोकविद्या.
- लोकविद्या कॉलेज आणि विद्यापीठांच्या बाहेर समाजात वास करते.
- जे लोक कॉलेज आणि विद्यापीठांच्या बाहेर आहेत ते अज्ञानी नसतात. ते समाजातूनच ज्ञान मिळवून आपला जीवन निर्वाह करतात.
- शेतकरी, सर्वप्रकार चे कारागीर, आदिवासी, डागडुजी आणि इतर सेवा करणारे लहान व्यावसायिक, स्त्रिया आणि लोककलाकार हे सर्वच समाजातून ज्ञान मिळवितात आणि या ज्ञानाच्या ताकदीवरच आपले आयुष्य जगतात. हे सर्व लोकविद्यावंत मिळून लोकविद्या समाज घडवतात.
- लोकांची वैचारिक बैठक, समाजातील नीतिमत्ता, तर्क करण्याच्या पध्दती, संघटनेचा विचार, परस्पर व निसर्गा बरोबरचे संबंध, कौशल्य व तत्वज्ञान हे सर्वच एकवटून लोकांचे ज्ञान–जगत बनते.
- लोकविद्या समाजात जगते. तिला कुठल्याही पुस्तकात धर्मात, जातीत, ग्रंथालयात, विद्यापीठात किंवा कंप्यूटरमध्ये बंदिस्त करणे शक्य नाही. ती लोकांतच राहते आणि वाढते.
- लोकविद्या अखंड नवीन होत असते. आपल्या व समाजाच्या गरजांनुसार आपल्या अनुभवांच्या तर्क–बुध्दीच्या व प्रयोगांच्या आधारावर लोक सतत लोकविद्ये चा विस्तार करत असतात.

- लोकविद्येतच लोकांच्या ताकदीची व क्षमतांची बैठक आहे. या ताकदीवर लोक आपली उपजीविका तर चालवतातच, परंतु निसर्गाशी व आपसातील संबंध ही घडवतात, काय चूक काय बरोबर याची ओळख करतात, अन्यायाशी झगडतात आणि नीतिमूल्ये व तर्कबुध्दीची वीण घालून एक विश्वदृष्टीही घडवतात.
- लोकविद्या श्रम आणि बुध्दी यांत फारकत करत नाही. कुठल्याही कार्याला फक्त श्रमाचे कार्य मानत नाही आणि शरीर श्रम करणाऱ्याला केवळ मजूर ही मानत नाही.
- समाजात व्याप्त सामाजिक व आर्थिक विषमता लोकविद्येला विद्यापीठातील ज्ञानाच्या बरोबरीचा दर्जा मिळाल्या शिवाय दूर होऊ शकत नाही.
- लोकविद्या जन आंदोलन हे लोकविद्या समाजाचे ज्ञान आंदोलन होय. लोकविद्या आणि लोकविद्या समाजाला मनुष्य समाजात समतेचा दर्जा मिळवून देणे हे या आंदोलनाचे उद्दिष्ट आहे.



# विषय - प्रवेश

समाजात गरीब कोण आहे? सर्व समाजावर एक नजर फिरवली की याचे स्पष्ट उत्तर सापडते. गरीब तो आहे जो शेती करतो, कारागीर आहे, किंवा आदिवासी आहे, गावातील दुकानदार आहे, किंवा ठेल्यावर व्यवसाय चालवतो. मजूर तर गरीब आहेच. या सर्व गरीब कुटुंबांतील लोक शाळा–कॉलेजात शिकलेले असे कमीच आढळतात. पण याचा अर्थ असा नव्हे की ते अज्ञानी आणि अडाणी आहेत. या सर्वांकडे लोकविद्येचे ज्ञान आहे. शासन दरबारी फक्त शाळा–कॉलेज शिकलेल्यांनाच ज्ञानी समजले जाते आणि फक्त त्यांच्या साठीच नियमित मिळकतीच्या व्यवस्था तयार केल्या जातात. लोकविद्या–समाजाला मात्र दारिद्याच्या दरीत लोटले जाते. ही परिस्थिती बदलणे गरजेचे आहे. सरकारने हे पक्षपात पूर्ण धोरण थांबवले पाहिजे, आणि लोकविद्येच्या बळावर काम करणाऱ्यांसाठी नियमित मिळकतीची जवाबदारी उचलली पाहिजे. या पुस्तिकेत याच विचाराचे विवेचन मांडलेले आहे.

लोकविद्या म्हणजे काय हे सर्वच ओळखतात. तरी, सुरवातीलाच याची संक्षिप्त मांडणी केलेली आहे. लोकविद्या म्हणजे प्रशस्त आणि श्रेष्ठ असे ज्ञान आहे, असा दावा मांडल्याशिवाय लोकविद्या–समाजाला स्वतःच्या बेहालीतून सुटका नाही. 'लोकविद्या जन आंदोलन' लोकविद्येसाठी ज्ञानाचा दर्जा प्रशस्त करायचे आंदोलन आहे, लोकविद्ये साठी विद्यापीठातील ज्ञानाशी बरोबरी ची प्रतिष्ठा साधण्याचे आंदोलन आहे. तिसऱ्या व चौथ्या प्रकरणात याची मुद्देसूद मांडणी केलेली आहे. लोकविद्या समाजातील वेगवेगळे समुदाय कशा प्रकारे स्वतः कडील ज्ञानासाठी समानतेचा दावा करू शकतात याची मांडणी सातव्या व आठव्या प्रकरणात केलेली आहे.

शेतकरी समाज असो वा कारागीर समाज, आदिवासी समुदाय असो वा लहान व्यावसायिकांचे समाज, सर्वांच्याच आपापल्या सामाजिक पंचायती व संघटना आहेत. या लहान लहान विकेंद्रित संघटनांचे प्रमुख आपापल्या लोकांचे प्रश्न सोडवीत असतात, त्यांच्यात नवीन विचार नेत असतात आणि काय स्वीकारावे व काय दूर सारावे यावर विचार–विमर्ष करत असतात. लोकविद्या समाजातील अशा प्रमुखांबरोबर, या समाजातील विचारक व त्यांच्या लढ्यांच्या नेतृत्वाबरोबर लोकविद्ये साठी ज्ञान म्हणून समते चा दावा समाजात मजबुती ने करता यावा यासाठी संवाद साधण्याच्या दृष्टीने ही पुस्तिका तयार केलेली आहे. या आंदोलनाची मूल्ये व उद्दिष्टे काय आहेत आणि हे आंदोलन कसे उभे करता येऊ शकेल याची प्रारंभिक मांडणी पाचव्या व सहाव्या प्रकरणात केलेली आहे. ज्ञान–पंचायती भरवून लोकविद्येला इतर ज्ञान व्यवस्थांच्या बरोबरीचा दर्जा मिळावा या करिता समाजांतर्गत व वेगवेगळ्या समाजांमध्ये गंभीर संवाद घडवून आणण्याचे उद्दिष्ट उराशी बाळगून लोकविद्या समाजांच्या नेतृत्वाने पुढाकार घ्यावा! हेच लोकविद्या समाजाचे ज्ञान–आंदोलन ठरेल.

'लोकविद्या प्रचार यात्रा' आणि 'समाज परिवर्तनाचे नवीन तत्वज्ञान' या प्रकरणांमध्ये लोकविद्या विचार व कार्य यांवर क्रमवार चर्चा केलेली आहे, आणि समाज परिवर्तनाचा जागतिक संदर्भ ओळखून लोकविद्या विचाराचे स्थान निश्चित केलेले आहे.



# देशाच्या खुशालीचे मार्ग

देशाच्या खुशालीसाठी खालील दोन मुद्यांवर धोरण ठरवणे व त्यावर अंमल करणे गरजेचे आहे.

- प्रत्येक वयस्क स्त्री–पुरूषा करिता ठराविक व नियमित मिळकत असावी.
- शाळा–कॉलेजातील ज्ञान व लोकविद्या यांत भेदभाव नसावा.

1. देशातील प्रत्येक नागरिकासाठी ठराविक व नियमित मिळकत असावी आणि ती सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारापेक्षा कमी असू नये, अशी व्यवस्था अस्तित्वात आली तर ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक घरात सुख नांदेल आणि एकंदर सर्वच देश समृध्दी व संपन्नतेच्या मार्गावर पुढे जाईल.
2. शेतकऱ्याकडे शेतीचे ज्ञान आहे, कारागीर स्वतःच्या कारागिरीत निपुण आहे, आदिवासींकडे जंगलांचे अफाट ज्ञान आहे आणि लहान दुकानदार किंवा व्यावसायिक लहान भांडवलाचा कुशल व्यवस्थापक आहे, तरी या समाजांच्या ज्ञानाला ज्ञान म्हणून मान्यता आजच्या समाजात नाही. शासन दरबारी फक्त शिक्षित व्यक्तीच नियमित मिळकतीचा अधिकारी समजला जातो. जो शाळा–कॉलेजात शिकलेला नाही तो अज्ञानी कसा? त्याला नियमित मिळकत का नसावी? तो या देशाचा नागरिक नाही का?
3. शासन या बाबतीत सतत विषम निकष लावते. बेरोजगारी किती या साठी फक्त शिक्षित बेरोजगारांची गणना केली जाते, आणि त्यांच्याच मिळकतीच्या योजना आखल्या जातात. शेतात राबणारा शेतकरी, घरोघरी उत्पादन करणारे कारागीर, जंगलात जगणारे

आदिवासी, ठेलेवाले, लहान व्यावसायिक किंवा या सर्व कामांत बरोबरीने राबणाऱ्या स्त्रिया यांची मिळकत निश्चित व नियमित असावी याला शासन स्वतःची जवाबदारी मानत नाही.

4. शिक्षणाच्या क्षेत्राबाबत देखील असेच दुतोंडी धोरण बघायला मिळते. शाळा–कॉलेजात शिकणाऱ्यांवर मोठा खर्च केला जातो, सुविधा दिल्या जातात व त्यांना नियमित मिळकत असावी असे मानले जाते. तर दुसरीकडे मात्र स्वकष्टावर व स्वतःच्या प्रयत्नांनी समाजातील ज्ञान संपादन करणाऱ्यांसाठी कुठलीच सरकारी मदत उपलब्ध नसते. अशा प्रकारे ज्ञान मिळवून त्या बळावर उपजीविका संपादन करणाऱ्यांसाठी नियमित उत्पन्नाची हमी देखील नसते. ठराविक व नियमित उत्पन्न असायला शाळा–कॉलेजातील शिक्षणाचा निकष खोटा व पक्षपातीच आहे.

5. लोकविद्येच्या बळावर होणाऱ्या उत्पादनाची मात्रा किंवा गुणवत्ता विद्यापीठांतील ज्ञानाच्या आधारावर होणाऱ्या उत्पादनाच्या तुलनेत किंचित ही कमी नाही. असे असूनही शेतकरी व कृषि–शास्त्राचा प्राध्यापक, विणकर व टेक्सटाइल इंजीनियर, मासेमार व जल–शास्त्रज्ञ, आदिवासी व वनविभागाचा अधिकारी, स्थानिक आरोग्य कामगार व कम्पाउंडर, वीज–मशीन व गृह निर्मितीतील कामगार, कारागीर व सार्वजनिक बांधकाम विभागाचे टेक्नीशियन किंवा इंजीनियर, लहान दुकानदार व मार्केटिंग व्यवस्थापक यांच्या मिळकतीत जमीन–अस्मानाचा फरक का असावा? हर प्रकारच्या ज्ञानाची गरज समाजाला असताना या सर्वांनाच त्यांनी केलेल्या कार्याचा समान व न्याय्य मोबदला का मिळू नये? शेतकरी, कारागीर, आदिवासी, स्त्रिया, मजूर, लहान व्यावसायिक व युवा या सर्वांनाच त्यांना जे ज्ञान अवगत आहे त्याच्या बळावर ठराविक व नियमित उत्पन्न मिळायलाच हवे!



6. कुठलाच माणूस फक्त मजूर नसतो. त्याला कुठले तरी ज्ञान अवगत असते, कुठल्या तरी कार्यात तो निष्णात असतो. आज रोजंदारीवर काम करणारे सर्वच शेती, कारागिरी, दुकानदारी किंवा दुसऱ्या कुठल्यातरी ज्ञानाचे धनी आहेत. त्यांच्या ज्ञानाला उपयुक्त असे काम त्यांना मिळवून देणे व त्या कामासाठी त्यांना योग्य मोबदला मिळवून देणे या गोष्टींची जवाबदारी उचलण्या ऐवजी शासन मात्र त्यांना अशिक्षित ठरवून स्वस्त मजूर बनवण्यातच धन्यता मानत आहे. हा त्यांच्या ज्ञानाचा व लोकविद्ये चा घोर अपमानच आहे!

7. एकीकडे सरकारी कर्मचाऱ्यांसाठी वेतन आयोग व उत्पन्नात नियमित वाढ, तर दुसरीकडे मात्र लोकविद्येच्या बळावर जगणाऱ्यांसाठी आक्रामक बाजारपेठेच्या अंकुशा खाली स्वतःचे जीवन चालवायची बळजबरी, हेच शासकीय धोरणाचे मर्म आहे. परिणामी या दोहोत उत्पन्नाची दरी रूंद व खोल होत चालली आहे. सर्व प्रकारच्या सुविधा व अनुदाने धरून सरकारी कर्मचाऱ्यांचे किमान दरमाही उत्पन्न 20,000 रू च्या घरात आहे, तर दुसरीकडे सामान्य शेतकरी किंवा कारागीर 5–7 हजार रू. मासिक मिळकत ही जमवू शकत नाही, आणि ती ही नियमित नाही. हे तर उघड उघड दुतोंडी धोरण आहे. वर्तमान परिस्थितीत कोणाचे ही उत्पन्न दिवसाला 1000 रू. पेक्षा कमी असू नये!

8. मानव इतिहासातील अधिकतम काळ असे आहेत की जेव्हा लोकविद्येला ज्ञान मानले गेले आणि एकंदर समाजात लोकविद्या आणि लोकविद्या समाज दोहोला मानाचे स्थान मिळाले. या काळात संघटित ज्ञान आणि लोकविद्या यात परस्पर देवाण

घेवाण व बंधुभाव होता. असे कालखण्ड कमीच की ज्यात लोकविद्येला तिरस्कृत केले गेले. याची तुलना या गोष्टीशी होऊ शकेल की मानव इतिहासात केंद्रीकृत सत्तेचे कालखंड असे लहानच होते, आणि ज्या दरम्यान लहान व विक्रेंद्रित सत्तांच्या मार्फतच समाज घडला, असाच काळ मोठा आहे. म्हणजेच देशाच्या उज्वल व वैभवशाली परंपरेचा वारसा लोकविद्या–समाजाकडेच असल्याचे स्पष्टच आहे. हा वारसा स्वीकारून देशाच्या भविष्यकाळातील खुशालीचे मार्ग सांगण्याचा दावा आज लोकविद्या–समाजालाच मांडावा लागेल!

9. कसेल त्याची जमीन, मजुरांसाठी योग्य मजुरी, लहान व कुटिर उद्योगांसाठी बाजारपेठ, शेतमालाला रास्त भाव आणि दलित, आदिवासी व मागास समाजांसाठी आरक्षण या मागण्या समाज परिवर्तन, व्यवस्था परिवर्तन आणि आर्थिक सुरक्षेसाठी झटणाऱ्या व्यक्ती व संघटनांनी गेली 100 वर्षे जोमाने मांडल्या. खाजगीकरण, खुली अर्थव्यवस्था व बाजारीकरणाच्या आजच्या युगात गरीब समाजांची सर्वात योग्य व सशक्त मागणी प्रत्येक कुटुंबात सरकारी नोकरी प्रमाणेच एक ठराविक व नियमित उत्पन्न असावे, हीच आहे!

10. यासाठी गावोगावी, तालुक्या तालुक्यात आणि लहान वस्त्यांत रोजगार–कार्यालये उघडली पाहिजेत. प्रत्येक अशी व्यक्ती, की जिला ठराविक व नियमित उत्पन्न मिळवायची इच्छा आहे, या कार्यालयात आपले नाव व तिच्याकडे असलेले ज्ञान यांची नोंद करवू शकेल. लोकविद्येच्या जोरावर नियमित उत्पन्नाने गावोगावी एका नव–स्वातंत्र्याचा संदेश पोचेल. देशातील सर्व श्रम व ज्ञान कामी लागेल. देश पुढे न्यायचा यापेक्षा अधिक प्रभावशाली व वेगवान असा मार्ग दुसरा तो नाही.

◢◢◢



# ठराविक व सरकारी कर्मचाऱ्यां बरोबरीच्या उत्पन्नाची मागणी पुढे रेटा

यासाठी खालील दोन मुद्यांवर विश्वास दृढ करावा लागेल.

- सर्व लोकविद्या–समाजाने एकीने 'लोकविद्या ज्ञान आहे' हा दावा मांडणे.
- लोकविद्यावंत आणि सरकारी कर्मचारी यांना समान मान व उत्पन्नाचा दावा मांडणे.

यासाठी खालील गोष्टींवर विचार करा व लोकां समक्ष आपले विचार मांडा.

1. लोकविद्या व कॉलेजांमधील विद्या यांना समान उत्पन्न व मान मिळाला तर शेतकऱ्यांची मुले गाव व शेती सोडून मजुरीसाठी का भटकतील? घरांतील स्त्रिया दुसऱ्यांच्या घरांत असन्मानपूर्ण अशी कामे का करतील? लोकविद्येच्या बळावर जगण्याचा अधिकार तर जन्मसिध्द अधिकार आहे. हा अधिकार हिरावून घेणे ही या समाजातली सर्वात मोठी हिंसा आहे.
2. तरी आज नेमके हेच घडत आहे. देशातील तीन चतुर्थांश पेक्षा जास्त लोक आपले आयुष्य लोकविद्येच्या बळावर जगत आहेत. हे सर्वच गरिबी, अस्थिरता व असमानतेचे बळी ठरले आहेत. या सर्वांची परिस्थिती भयाण आहे. यांना आपल्या जगातून विस्थापित होवून जीवन कंठावे लागत आहे. त्यांनी केलेल्या उत्पादनाला बाजारपेठेत किंमत नाही.
3. लोकविद्या–समाजातील प्रत्येकाला ताठ मानेने जगायला संघर्ष करावा लागतो. वीज, पाणी, वित्त व कच्चा माल या सर्वांबाबतची

शासकीय धोरणे त्यांच्या समोर अडथळा म्हणून उभी ठाकतात. एवढेच नव्हे तर नागरिक म्हणून असलेले त्यांचे हक्क कधी ही हिरावले जातात व त्यांच्या काम करण्याच्या जागा, त्यांचे समाज, त्यांची काम करण्याची साधने व एकंदर त्यांच्या विश्वापासून त्यांना दूर लोटून विस्थापितांचे जीवन जगण्यास भाग पाडले जाते. परिणामी त्यांना त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानाच्या वापरा पासून देखील वंचित केले जाते. 'विकास', आधुनिक तंत्रज्ञान आणि शहरीकरणाच्या व्यवस्थेत त्यांना स्वतःचे ज्ञान–आधारित आयुष्य सोडून नवीन व्यवस्थांचे गुलाम बनून रहावे लागते. परिणामी ते शिक्षण, आरोग्य व गाव–वस्त्यांतील रस्त्यांची सफाई अशा सामान्य सार्वजनिक सुविधांना ही मुकतात. अशा बिकट परिस्थितीत ही ते आपल्या ज्ञानाच्या ताकदीवर जगतात. अर्थात्, भेदभावपूर्ण असमानतेची वागणूक सहन करूनच हे शक्य होते.

4. एकीकडे स्वतःच्या ज्ञान व श्रमातून झालेले उत्पादन कमी किंमतीत विकायला, आणि दुसरीकडे गरजेच्या सर्व गोष्टी भरमसाठ किमती मोजून विकत घ्यायला या सर्व लोकांना बाध्य करणारे शासकीय धोरणच त्यांच्या हलाखीच्या जगण्याला कारणीभूत आहे. शेतकरी, आदिवासी, कापूस – माती – धातू – काच – लाकूड – दगड – प्लास्टिक वापरून तऱ्हे तऱ्हेच्या वस्तूंचा निर्माण करणारे सर्व कारागीर, न्हावी, धोबी, मासेमार, आरोग्य–कर्मचारी असे विविध सेवा देणारे, मशीन–मोटार–वीज–पाणी–घर यांची कामे करणारे मिस्त्री, लोक–कलाकार, ठेले – लहान दुकाने चालवणारे व्यावसायिक सर्व प्रकारच्या कामांचे मजूर व या सर्वांच्या घरांतील स्त्रिया असा लोकविद्यावंतांचा हा विशाल समाज आहे. वर्तमान व्यवस्थेत देशातील 80 टक्के लोकांचा हा समाज अक्षरशः ठगला जाते आहे.

5. नेते मंडळी व शिक्षित समाजाचे म्हणणे असे आहे की या सर्वांनी शिक्षण घ्यावे व नोकऱ्या कराव्यात, कोणी रोकले आहे? परंतु स्वातंत्र्याची 65 वर्षे लोटून गेली तरी सार्वजनिक शिक्षणाचे स्वप्न



दाखविण्या पलिकडे ही सरकारे जावू शकली नाहीत. आणि सर्वांना नोकरीचे बोलावे, तर याचे साधे स्वप्न देखील शासनाला दाखविता आले नाही! लोकविद्ये सारख्या श्रेष्ठ ज्ञानाचे धनी असणारे या विशाल समाजातील सर्व लोक शासन–दरबारी अज्ञानीच ठरविले गेले. या सर्वांनी समोर येऊन आपल्याकडे असलेल्या लोकविद्येच्या श्रेष्ठत्वाचा दावा ठोकून या व्यवस्थे समोर आव्हान उभे करण्याची वेळ आज आलेली आहे.

6. देशाचे नेतृत्व, प्रशासन व शिक्षित लोक लोकविद्येला ज्ञानाचा दर्जा द्यायला तयार नाहीत, हे देशाचे मोठे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. लोकविद्या–समाजातील लोकांनी केलेल्या कामाला निव्वळ शारीरिक श्रम समजले जाते. असे मानले जाते की त्यांच्याकडे जास्तीत जास्त काय तर असे श्रम करून सहज प्राप्त होणारे कौशल्यच काय ते असू शकते. 'ज्ञान' तर फक्त शिक्षणातूनच मिळू शकते समाजाचे घातक नसलेल्याची अंधश्रध्दा आहे. ही अंधश्रद्धा एवढी दृढ आहे की लोकविद्यावंतांनी केलेल्या कामातले सिध्दांत, तर्क व मूल्यांचे अस्तित्वच मुळी हे घटक सुरवाती पासूनच नाकारतात. अशा अंधश्रध्देने भारावलेल्या या परिस्थितीत 'लोकविद्या हे ज्ञानच आहे' हे ठामपणे मांडणे गरजेचे आहे. याशिवाय शेतकरी, कारागीर व आदिवासी समाजात समतेचा दावा करू शकणार नाहीत.

7. तर लोकविद्या–समाजासमोर मार्ग काय? आमच्या मते लोकविद्या समाजाला आपली दुरवस्था संपवण्यासाठी स्वतःच्या ज्ञानाचा दावा मांडावा लागेल. या साठी या समाजाने सर्वप्रथम स्वतःला ज्ञानी समाज समजणे व त्या बळावर स्वतःकडील ज्ञानासाठी सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीचा मान, मोबदला व साधने या समाजाला मिळावीत अशी मागणी करणे आवश्यक आहे. याने या समाजाचे आत्मबळ तर वाढेलच, शिवाय आपला देशही स्वाभिमान, समृध्दी आणि सन्मानाच्या मार्गाने पुढे जाईल.

# हे कसे घडू शकेल?

सर्वांसाठी खुशाली आणि समान उत्पन्नाचा मुद्दा येताच सामाजिक कार्यकर्ते व अन्य सक्रिय व्यक्तींना वेगवेगळे प्रश्न पडतात. गेली तीन वर्षे लोकविद्या जन–आंदोलन ही मोहीम चालवत आहे. या मांडणीवर दोन प्रकारच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळतात. पहिली अशा लोकांकडून की ज्यांना समान उत्पन्नाची मागणी अजिबात मान्य नाही. असे लोक मागणीचा विरोध तर करतातच, शिवाय या मांडणीची खिल्ली उडवायचे प्रयत्न करायला ही मागे पुढे पाहत नाहीत. दुसरी प्रतिक्रिया मागणीच्या स्वागताची असते. ही प्रतिक्रिया देणारे मोहिमेशी सहकार्य करतात आणि प्रामुख्याने दोन प्रश्न विचारतात. एक हा की ज्याला बाजारपेठेत आपल्या कामाची 300 रू. रोजीच मिळते त्यासाठी शासन 1000 रू. ची व्यवस्था का करेल. तर दुसरा प्रश्न असा की जर शासनाने असे केले तर त्यासाठी फार मोठा पैसा लागेल व तो सरकारने कुठून उभा करावा.

1. सर्व प्रथम हे समजून घ्यायला हवे की समान उत्पन्नाच्या मागणीतून आपण सरकारला असे कुठल्याच प्रकारचे काम करायला सांगत नाही की जे इतर घटका साथी पासूनच करत आलेले नाही. प्रशासन, शिक्षण, आरोग्य, उद्योग, शेती अशा कुठल्याही सरकारी व्यवस्थेचा विचार करा – तुम्हाला असे दिसेल की तिथल्या सरकारी कर्मचाऱ्यांवर जर खुल्या बाजारपेठेतून कमवायची वेळ आली तर ते आपल्या नियमित पगाराच्या एक चतुर्थांश ही मिळकत घेऊ शकणार नाहीत! ज्यांना शासन दिवसाला 1000 रू. पेक्षाही जास्त पगार देते त्यांना बाजारपेठेत 300 रू. कमवणे ही अवघड ठरेल. तर मग, लोकविद्या समाजाचा प्रश्न येताच, शासनाने बाजारपेठ व वेतन यातली तफावत का भरून काढावी, असे कसे म्हणता येईल? आज दीडशे वर्षांपासून सरकार समाजातील एकाच घटका साठी ही तफावत भरुन काढत आले! आपली मांडणी एवढीच आहे की शासनाने सर्वच लोकांच्या बाबतीत एकच दृष्टिकोन बाळगावा, माणसा–माणसात भेद करू नये, समान काम करणाऱ्यांना समान उत्पन्नाचा हक्क मानावा, व तसे होईल याची हमी घ्यावी. सरकारी कर्मचारी माणूस आहे व इतर लोक माणसा पेक्षा कमी आहेत, हा विचार आता संपायलाच हवा!



2. आपले कर्मचारी, भांडवलदार, व्यापारी व ठेकेदार यांच्यासाठी पैसा, व्यवस्था, सुविधा, वेगवेगळया प्रकारच्या सुटी, सुरक्षा व पर्याय या सर्वांची व्यवस्था शासन करते. यासाठी पैसा ही उभा करते. तो कुठून येतो? हा प्रश्न आपण का विचारत नाही? या सर्व लोकांसाठी शासन एक दूरगामी स्थिर व्यवस्था आज देत आहे, हे आपण सर्वांनी नीट समजून घ्यायला हवे. याउलट लोकविद्या–समाजातील लोकांसाठी फक्त काही तुकडे टाकून दिलासा देण्याच्याच योजना शासन बनवते. लॅपटॉप, बेरोजगारी भत्ता, शाळेतल्या मुलींसाठी सायकल, लग्नासाठी स्त्री–धन, 2 रू. किलो तांदूळ, लाल कार्ड, पांढरे कार्ड, स्वस्त धान्य, फुकट खाती, घरात शौचालय, आरोग्य कार्ड, दुपारचे जेवण, सर्व शिक्षा अभियान आणि अशाच किती तरी योजना शासन बनवते. लोकविद्या–समाजातील लोकांचे जगणे सरकारी धोरणांनी हेतुपुरस्सर इतके हलाखीचे बनवून ठेवले आहे की त्यांनी या दिलासा–योजनांमध्येच अडकून रहावे. प्रत्येक कुटुंबासाठी एक ठराविक व नियमित उत्पन्न असावे व असे झाले तर लोकांना कुठल्याच सरकारी योजनांची गरज राहणार नाही, याकडे मात्र शासन सातत्याने दुर्लक्ष करते. इथे प्रश्न पैसे कुठून येतील असा नाहीच. प्रश्न आहे तो सरकारच्या प्राथमिकतेचा, उद्दिष्टांचा, राजनीती चा आणि दृष्टी चा!

# या मोहिमेची नीतिमूल्ये व लक्ष्य

या मोहिमेचे अंतिम लक्ष्य असा समाज घडवण्या साठी पुढे वाटचाल करण्याचे आहे की ज्यात सर्व ज्ञानी, सुखी व समान आहेत.

हे लक्ष्य गाठण्यासाठी केलेल्या सर्वच कार्यात खालील नीतिमूल्यांचे स्थान सर्वोपरी असेल.

1. समाजातील सर्वच लोकांच्या खुशालीचा विचार व कार्य व्हावे.
2. सर्वांसाठी समान मापदंड असावे.
3. सर्वच ज्ञानप्रवाहांचा दर्जा समान मानावा.
4. समाजातील गरीबी व असमानता नष्ट व्हावी.
5. धरती–माते बरोबर सूर जुळवून जगणे सांगणाऱ्या ज्ञानाला प्रतिष्ठा असावी.

◢◢◢



# लोकविद्या समाजाने आपल्या ज्ञानाचा दावा कसा मांडावा?

सर्व प्रथम हे समजून घेणे गरजेचे आहे की 'आपल्या ज्ञानाचा दावा मांडणे' याचा नेमका अर्थ काय. 'प्रत्येकाला त्याच्या कडे असलेल्या ज्ञानाच्या ताकदीवर त्याला करता येईल ते काम मिळावे आणि यासाठी सरकारी कर्मचाऱ्यां बरोबरीचा मान, उत्पन्न व सुविधा त्याला मिळाव्यात', ही मागणी करणे, असा याचा अर्थ होय. इथे लोकविद्या समाजाच्या काही महत्वाच्या घटकांना ही मागणी कशी रेटता येईल या संबंधी आपण विचार करू. या शिवाय जे युवक त्यांच्या समाजांत होत असलेल्या उत्पादक कार्यां व्यतिरिक्त इतर कामे ही करत आहेत, त्यांच्या बद्दल ही आपण बोलू.

## १. शेतकरी समाजाने आपल्या ज्ञानचा दावा कसा मांडावा?

- शेतकऱ्याचे ज्ञान कृषि पाध्यापक किंवा कृषिशास्त्रज्ञा पेक्षा कमी नाही. जर प्राध्यापक किंवा शास्त्रज्ञाला दरमहा 50 हजार ते 1 लाख रू. उत्पन्न असेल तर तेवढीच ठराविक व नियमित मिळकत शेतकऱ्याची ही असायला हवी.
- कुठल्याही शेती प्राध्यापकाला किंवा शास्त्रज्ञाला शेतावर पीक घ्यायचे काम सोपवून बघा! दोघेही शेतकऱ्यासमोर नापास ठरतील! म्हणून आपण त्या प्राध्यापकाला किंवा शास्त्रज्ञाला अज्ञानी मानतो का? निश्चितच नाही. तर मग, जो फक्त लिहू–वाचू शकत नाही,

पण भरघोस पीक मात्र घेऊ शकतो, तो अडाणी कसा? उत्पन्ना विषयी त्याचा अधिकार कमी का मानावा? फक्त लिहिण्या–वाचणाऱ्याला लाख रू. दरमहा द्यायचे व जो खरेखुरे पीक काढतो त्याला वर्षभरात ही एवढे बघायला मिळू नये? बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात चालणार नाही, खरी शेती करणाऱ्याला स्वतःचा दावा मांडावयाचा आहे.

- वर्षानुवर्षे कठिण परिश्रमातून निसर्ग, जमीनीचा पोत, आर्द्रता, तिच्यात वसणारे कीटक–जन्तु, हवामानातले बदल, बियाणांचे प्रकार, पिकांची निगराणी, पाण्याचे व्यवस्थापन या बद्दल शेतकरी ज्ञान मिळवतो, कॉलेजला लागतो त्याहून जास्त वेळ यात लागतो. प्रत्येक शिवार हे शेतकऱ्याचे विद्यालयच होय. तरी देशाचे नेतृत्व व शिक्षित समाज त्याच्या कामाकडे निव्वळ शारीरिक श्रम म्हणून बघतो, ज्ञानाचे काम म्हणून नव्हे. माझे सर्व काम ज्ञानातून केलेले कार्य आहे व माझे घर व शिवार कुठल्याही शाळा–कॉलेज पेक्षा कमी नाही, असा दावा शेतकऱ्याने करायचा आहे.
- बियाणे, हवामान, इतर गरजा व सरकारी धोरणांतले फेरफार हे सर्व लक्षात घेऊन शेतकऱ्याला रोज नवीन प्रयोग व संशोधनांचा प्रपंच करावा लागतो. हे सर्व तो स्वतःच्या जोखमेवर करत असतो. प्रत्येक नवीन प्रयोगा चा, यशापयशा चा, नफा–नुकसानी चा भार त्याला पेलावा लागतो. याच प्रयोगांतून त्याच्या ज्ञानाचे सतत नवीनीकरण घडत असते. तरी त्याच्या ज्ञानाला मागास, परंपरावादी, अंधश्रद्धेने ग्रासलेले समजले जाते! माझे ज्ञान सजीव, समकालीन व श्रेष्ठच आहे, असा दावा शेतकऱ्याला मांडायचा आहे.



- शेतकऱ्याचे ज्ञान निसर्गाशी तालबध्द होऊन वाढते. ते पृथ्वी व निसर्गाला मातेचा दर्जा देते. या आईची सेवा म्हणजेच जीवन समृध्द करायचा मार्ग आहे, हे मानते. कुठली ही नवीन गोष्ट करताना शेतकरी त्या कामाच्या अल्पकालीन व दूरगामी परिणामांबद्दल नीट विचार करतो. नंतरच नवीन पाऊल उचलतो. त्याचे काम व त्याचे परिणाम यांनी निसर्गाचा ताल बिघडू नये, याविषयी तो सतर्क असतो. या उलट विद्यापीठांतील ज्ञान निसर्ग व मनुष्य समाज दोहोंवर नियंत्रण साधण्याच्या उद्दिष्टाने ग्रासलेले असते. नियंत्रणाच्या या संकल्पनेत हिंसा त्याज्य नाही. परिणामी विद्यापीठातील ज्ञानाने अभूतपूर्व हिंसाचाराला जन्म दिला. हिंसाचाराच्या याच वाटचालीला 'विकास' अशा गोंडस नावाने संबोधले जाते. या महासंकटात लोकविद्याच निसर्गाचा नाश थोपवू शकते, असा दावा मांडायचा आहे.
- शेतकऱ्याचे ज्ञान उपजतच सामाजिक असते. ते समाजातच जन्मते व वाढते. ज्याला या ज्ञानाच्या आधारावर जीवन जगायची इच्छा असेल, त्याला ते ज्ञान मिळवणे, ते वापरणे, त्यात वाढ करणे व त्याचा प्रसार करणे या गोष्टींचा हक्क आहे. हे ज्ञान लोकांचे स्वतःचे ज्ञान आहे. ते कुठल्याही संस्था किंवा राज्याचे गुलाम नाही, तर ते लोकांकडे आहे. लोकांच्या ताकदीचा स्रोतच मुळी या ज्ञानात आहे. या ज्ञानाला लोकांपासून विभक्त करणे शक्य नाही. लोकविद्येच्या बळावर जगण्याचा अधिकार हा लोकांचा जन्मसिद्ध हक्क आहे व तो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. फक्त बाजारपेठ, जागतिकीकरण, विस्थापन, जी एम बियाणे यासंबंधी शासकीय धोरणांविरूध्द संघर्षा च्या मानसाने नव्हे, तर

जीवनात मूलभूत सत्याची ज्योत तेवत रहावी या करिता या जन्मसिध्द हक्काचा दावा करावाच लागेल व लोकविद्येसाठी विद्यापीठांतील ज्ञाना बरोबरीचा मान मिळवावाच लागेल.

- गेल्या शतकातल्या आठव्या व नवव्या दशकांत आपल्या देशात मोठे शेतकरी आंदोलन झाले. लोकविद्येतल्या ज्ञानाला मान असावा याचा पाया या आंदोलनानेच टाकला. शेतमालाला भाव, वीज व कर्ज या बद्दलच्या मागण्या या आंदोलनाने समोर आणल्या. आपल्या ज्ञानासाठी व श्रमासाठी उचित मोबदला व शेतीसाठी साधने उपलब्ध करून घेणे हेच या आंदोलनाचे मर्म होते. यातूनच लोकविद्येचा दावा पुढे रेटायचा मार्ग मोकळा झाला. लोकविद्येतील ज्ञानावर आधारलेल्या कामासाठी सरकारी कर्मचाऱ्यासारखे ठराविक व नियमित उत्पन्न, व हे काम करता यावे यासाठी साधने व राष्ट्रीय संपत्तीत योग्य व समान वाटा यांची मागणी करणे हेच शेतकरी आंदोलनाचे पुढचे पाऊल ठरावे.
- देशात शेतीवर जगणारी जनसंख्या फार मोठी आहे. शेतकऱ्यांचे समाज शेतीचे ज्ञानी आहेत. कोणी धान्य, कोणी भाज्या तर कोणी फळा–फुलांची पिके घेतात. यात सर्व जाती व धर्माचे लोक आहेत. आदिवासी, दलित, कारागीर, सर्वच. जर हे सर्व त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानाला बरोबरीचा मान मिळविण्यासाठी एकत्र आले तर विविध ज्ञान–प्रवाहातील विषमता व असमानता मिटेल. म्हणून लोकविद्येच्या जोरावर नियमित व ठराविक उत्पन्नाची मागणी प्रत्येक शेतकऱ्याला उचलावी लागेल.
- गावांच्या स्वावलंबनाचा हाच मार्ग आहे. संपूर्ण जगाबरोबर नवीन प्रकारचे संबंध व संपर्कांचे मार्ग याने मोकळे होतील. 'साधनांची कमतरता' हीच आज गावांची ओळख बनली आहे. आजचे प्रमुख साधन



म्हणजे वित्त! प्रत्येक कुटुंबात सरकारी नोकरी सारखे एक नियमित उत्पन्न असले तर या परिस्थितीत आमूलाग्र बदल घडू शकेल. शिवाय अशा विकेंद्रित रूपाने हे घडेल की ज्यात भ्रष्टाचाराला जागा उरणार नाही. खरे तर हर तऱ्हेच्या सामाजिक गटांसाठी स्वायत्तता व स्वावलंबनाचा मार्ग हाच आहे.

## २. कारागिरांनी आपल्या ज्ञानाचा दावा कसा मांडावा

- विद्यापीठ–कॉलेजात शिक्षित इंजीनियरच्या तुलनेत कारागिरांचे ज्ञान कुठेही कमी नाही. लोखंड, लाकूड, माती, दगड, काच, प्लास्टिक, कापूस, धातू इत्यादीपासून आपल्या ज्ञान व कौशल्याने गरजेच्या वस्तूंची निर्मिती कारागीर करतो. एवढेच नव्हे तर आधुनिक यंत्रे, कंप्यूटर, मोबाईल, नवीन तंत्रज्ञान आणि वीज, पाणी, इमारती व इंटरनेट सारख्या व्यवस्थांच्या रख–रखावी चे काम ही कारागीरच करतात. इंजिनीयर व शास्त्रज्ञाला मिळणाऱ्या उत्पन्ना एवढेच उत्पन्न कारागिराला ही मिळायला हवे.
- कुठल्या ही गावात, तालुक्यात किंवा मोठ्या शहरांतील गरीब वस्त्यांत जाऊन बघा! तिथे वेगवेगळ्या प्रकारच्या गरजेच्या वस्तूंची निर्मिती करणारे, तऱ्हेतऱ्हेच्या प्रक्रियांचे व्यवस्थापन करणारे व सेवा उपलब्ध करून देणारे कारागीर समाजच दिसतील. ते सर्व आपापल्या कामात निष्णात असतात. जनसंख्ये चा एक मोठा भाग त्यांचा आहे. शेतकऱ्याप्रमाणेच कठोर परिश्रमातून यांचे ज्ञान आकारते. वेगवेगळ्या पदार्थांचे गुणधर्म, इतर पदार्थांबरोबर त्यांची तुलना व संबंध, हे पदार्थ मिळण्याच्या जागा, वेगवेगळ्या बलांचे परिणाम व त्यांचे गणित, बाजारपेठा या सर्व विषयांचे ज्ञान त्यांच्याकडे असते. विणकर असो का इलेक्ट्रिशियन, मासेमार

असो वा मोटर–मेकॅनिक, धोबी असो का मोबाइल–मिस्त्री, बढई असो वा इमारत–मिस्त्री या सर्वांकडे त्यांच्या कामाचे ज्ञान आहे. त्यांच्या काम करायचा जागा व घरे या शाळा व प्रयोगशाळाच होत. दररोज नवीन आव्हाने पेलत ते आपले ज्ञान वाढवत असतात. अनेकदा तर विद्यापीठांतील मंडळी त्यांच्या बरोबर चर्चा करायला व त्यांचे मत घ्यायला येतात. तरी लोकविद्येला ज्ञानाचा दर्जा द्यायला मात्र ही मंडळी तयार नाही. अशा परिस्थितीत स्वतःच्या ज्ञानाचा दावा कारागिरानेच मांडायचा आहे.

- हवामानातील बदल, प्रदूषण, पर्यावरणाचे संकट, जल–संपत्तीचा अनिर्बंध वापर, भीषण जंगलतोड ही सर्व मोठ्या आधुनिक उद्योगांनी केलेल्या निसर्गाच्या नाशाची लक्षणे आहेत. या सर्व परिस्थितीचे जे काही निवारण संभवते त्यात कारागिरा चे स्थान इतर सर्वां समोर असायला लागेल, यात शंका नाही. कारागीर समाजाला जर त्याच्या ज्ञानाचा योग्य मोबदला मिळायला लागला व त्यांचे जीवनमान उंचावले तरच ते इंजीनिअर व शास्त्रज्ञ यांच्या समोर मानाने उभे राहतील. तेव्हाच ते आपले ज्ञान, तर्कबुद्धी व नीतिमूल्ये वापरून समाजाच्या पुनर्निर्मिती चे नवीन मार्ग देशासमोर आणतील. कोण जाणे यां कारागिरांत किती विश्वेश्वरय्या दडलेले आहेत!
- कारागीर समाजांत देखील सर्व जाती–धर्मांचे लोक आहेत, आदिवासी आहेत, दलित ही आहेत. नावाडी, विणकर, धोबी, रंगकर्मी, न्हावी, कुंभार, मोटर–सायकल मिस्त्री, कंप्यूटर व मोबाईल मिस्त्री, इमारत काम व वीज–पाणी क्षेत्रातील कारागीर सर्वांनाच स्वतःच्या ज्ञानाबद्दल आत्मविश्वास बळकट करावा लागेल आणि विद्यापीठांतील ज्ञानाशी बरोबरी साधण्याची मोहीम राबवावी लागेल. तरच समताधिष्ठित समाजाकडे वाटचाल होऊ शकेल.



## ३. आदिवासी समाजाने आपल्या ज्ञानाचा दावा कसा मांडावा

- आपल्या देशातच नव्हे तर सर्व जगात देखील आदिवासींची संख्या खूप मोठी आहे. साऱ्या जगात निसर्गाची क्षमता आदिवासींच्या ज्ञानाच्या बळावरच आजवर जपली गेली आहे. या समाजाची खुशाली, त्यांची सक्रियता, पुढाकार व भागीदारी ही केवळ त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानाच्या (लोकविद्येच्या) बळावरच शक्य आहे.
- विस्तृत भूभागांतील पाणी, जंगले, जीवसृष्टी व जमीन या संबंधीचे मोठे ज्ञान भांडार त्यांच्याकडेच आहे. हे ज्ञान शिक्षितांच्या ज्ञानाच्या तुलनेत कुठेही कमी नाही. या उलट ते निसर्गानुकूलच आहे. विद्यापीठांत या ज्ञानाला मान्यता नाही. आता आदिवासांनी आपल्या या ज्ञानाचा दावा मांडायची वेळ आलेली आहे.
- आरक्षणाच्या माध्यमांतून आदिवासी समाजांचा लहानसा भाग नोकऱ्या मिळवू शकला असला तरी अन्य सर्वच समाज आपल्या शेती व कारागिरीच्या ज्ञानावरच आपला जीवन निर्वाह करतो. या दृष्टीने आदिवासी, शेतकरी व कारागीर समाजांत बंधुभावच आहे. सर्वच जाणतात की आदिवासी समाजाचे ज्ञान निसर्गाशी तालबद्द होऊनच विकास पावलेले आहे. साऱ्या जगाच्या पुनर्निर्मितीचे मैत्रीपूर्ण व अहिंसक असे मार्ग आदिवासींच्या ज्ञानाला इतर प्रतिष्ठित ज्ञान–प्रवाहांबरोबरीचा मान मिळण्यातून तयार होऊ शकतात. आपल्या ज्ञानाला समानतेची व मानाची वागणूक मिळविण्याकरिता आदिवासींना या ज्ञानाच्या बळावर नियमित व ठराविक उत्पन्न मिळावे ही मोहीम राबवावी लागेल.
- इंग्रजांच्या साम्राज्यवादी राज्याचा विरोध आदिवासींच्या संघर्षांपासूनच

सुरू झाला. आपल्या ज्ञान–सामर्थ्याच्या जोरावरच त्यांनी इंग्रजांविरुध्द लढा उभारला. आज अनेक देशांतील आदिवासी आपल्या ज्ञानाची ताकद ओळखून आहेत व विकासाच्या विद्येवर प्रश्नार्थक ठसा उमटवत आहेत. ही प्रक्रिया मजबूत झाली पाहिजे. आदिवासींनी जागोजागी ज्ञान–पंचायती भरवून आपल्या ज्ञानाचा दावा मांडला पाहिजे.

## ४. लहान दुकानदार-व्यावसायिकांनी हा दावा कसा मांडावा

- ठेलेवाले, फेरीवाले, फुटपाथ व व्यवसाय करणारे, लहान दुकानदार हे सर्वच लहान भांडवल व कमी साधनांचे व्यवस्थापन करण्यात निष्णात आहेत. त्यांचे या संबंधीचे ज्ञान कुठल्याही बिजिनेस मॅनेजमेंट पदवीधरापेक्षा कमी नाही.
- हे सर्व दुकानदार किरकोळ वस्तूंच्या क्षेत्रात सर्व लोकांना वस्तू पोचवायचे काम करतात. प्रशासन, शासन व शिक्षित समाजांचा सतत तिरस्कार व विरोध झेलत अत्यल्प साधने वापरून ही ते आपल्या प्रभावी ज्ञानाच्या बळावर सर्वांना जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून द्यायला तत्पर असतात.
- या लहान लहान व्यवसायिकांत ही सर्वच जाती व धर्माचे लोक आहेत. ज्यांची शेती व कारागिरी बिकट परिस्थितींमुळे संपुष्टात आली व अशा कठिण प्रसंगी ज्यांना शहरांत व महानगरांत आसरा घ्यावा लागला असे शेतकरी व कारागीर ही या लोकांत बरेच आहेत.
- या लोकांना उध्वस्त करणारी, दारिद्यात ढकलणारी सरकारी धोरणे जर संपुष्टात आलीत तर ते आपल्या ज्ञान क्षमतेवर बहुराष्ट्रीय कंपन्यात लठ्ठ पगार घेणाऱ्या व्यवस्थापकांना ही सहज मागे टाकतील. बाजारपेठां संबंधीचे वर्तमान शासकीय धोरण मोठ्या भांडवल मालकांनाच पोसते आणि याही पुढे जाऊन किरकोळ वस्तू क्षेत्रात ही अशांचेच वर्चस्व वाढवण्याचे काम करते. हे सर्व व्यावसायिक एकत्र रूपाने आपल्या ज्ञानाचा दावा मांडूनच या परिस्थिती विरूध्द लढू शकतात. सर्व अर्थकारण न्यायपूर्ण पायावर आणायचा दावा त्यांनी मांडावा. लोकविद्या–समाजाची लूट करणाऱ्या बाजारपेठे जागी घरोघरी खुशाली आणणाऱ्या बाजारपेठेच्या निर्मितीचा दावा मांडावा.



- आजची बाजारपेठ दुभागलेली आहे. एक ती की जिच्या माध्यमाने लोकांची लूट होते व दुसरी ती जी लोकांना जीवनावश्यक वस्तू पुरवते. या दुसऱ्या बाजारपेठेत विकणारे व विकत घेणारे दोघे ही लोकविद्या समाजाचेच घटक असतात. ही लोकविद्या–बाजारपेठ होय. ही बाजारपेठ सर्वांच्या खुशालीचे एक प्रभावी माध्यम आहे.
- जागतिक शोषण व्यवस्थे विरुद्ध लढण्यात लोकविद्या बाजारपेठेची महत्वाची भूमिका आहे. तिचा पाया वेगळ्याच पठडीच्या ज्ञाना वर ठेवलेला असल्याने शेतकरी, कारागीर समाजांना इतर सर्वां बरोबर चे मानणारा समाज घडवण्याचे सामर्थ्य या बाजारपेठेत दडलेले आहे. हे सामर्थ्य वाढवायचे असेल तर लोकविद्या बाजारपेठेत काम करणाऱ्या सर्वांच्या उत्पन्नाची पातळी सरकारी कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतना बरोबरची असायला हवी.
- लोकविद्या बाजारपेठेत लोकविद्या समाज एकत्र येतो. शेतकरी, कारागीर, आदिवासी, महिला, कलाकार, सेवा कर्मचारी सर्वच येथे येतात व आपले ज्ञान व उत्पादन यांची देवाण–घेवाण करतात. ही बाजारपेठ लोकविद्या समाजाच्या एकीचा मंच म्हणून साकारण्यात लहान व्यावसायिकांचा वाटा मोलाचा असेल.

## ५. महिलांनी आपल्या ज्ञानाचा दावा कसा मांडावा

- सर्वच स्त्रिया लोकविद्येच्या धनी आहेत. मुलांचे पालन पोषण, देखरेख आणि मौलिक मानवी संवेदनशीलतेचे ज्ञान, क्षमता व आकलन या गोष्टी महिलांकडे असतात. आजवर कुठल्याही सभ्यतेने या ज्ञानाचे यामर्थ्य व महत्व नाकारले नाही. किंबहुना या ज्ञानाला श्रेष्ठच मानले. हां, आधुनिक सभ्यतेने मात्र निश्चितच या ज्ञानाला कमी लेखायचे आणि त्याचे महत्व कमी करायचे जमेल तसे प्रयत्न केले. मोजक्या स्त्रियांना डॉक्टर, इंजीनियर, प्राध्यापक, शास्त्रज्ञ व प्रशासकीय अधिकारी बनवण्याच्या प्रक्रियेत बहुसंख्य महिलांकडे असलेल्या ज्ञानाचा तिरस्कार मात्र वाढला. याचे प्रत्युत्तर स्त्रियांनी त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानाचा हक्क सांगून मांडावा.
- शेतकरी, आदिवासी व कारागीर समाजांतील स्त्रिया अशी अनेक कामे करतात की ती आता त्यांच्याच विशिष्ट ज्ञानक्षेत्राची मानली जातात. या ही पलिकडे त्या या सर्व ज्ञानप्रवाहांची राखण व पुढच्या पिढी पर्यंत ते पोचवायचे महत्त्वाचे कार्य करतात. शासकीय धोरणांनी शेती, कारागिरी व अनेक लहान व्यवसाय संपवून स्त्रियांच्या ज्ञान क्षेत्राचा संकोच मांडला आहे. एक माणूस व एक व्यक्ती म्हणून आपली ओळख सिध्द करायला सर्व स्त्रियांनी लोकविद्येचा हक्क सांगणे गरजेचे आहे. आपल्या ज्ञानाचे योगदान व व्याप या दोहों बद्दल समाजात जाण वाढवायची मोहीम महिलांनी राबवायची आहे.
- कौटुंबिक जवाबदाऱ्यां सोबतच प्राथमिक आरोग्य, खाद्य पदार्थ आणि व वस्त्र निर्मिती संबंधीचे विस्तृत ज्ञान स्त्रियांजवळ आहे.



घराघरातील स्वयंपाक घरे आणि अंगणे या ज्ञानाची विद्यालयेच आहेत. येथेच या ज्ञानाचे प्रयोग व त्यात संशोधन घडत असतात. असे असूनही आज शासनाकडून प्राथमिक आरोग्य, खाद्य पदार्थ आणि वस्त्र या तीन ही क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे स्वागत केले जात आहे व महिलांकडून ही कामे हिसकावून घेतली जात आहेत. उलट ही क्षेत्रे स्त्रियांकरिता राखीव असायला हवीत आणि यांतील वस्तू व सेवांसाठी स्त्रियांना सरकारी कर्मचाऱ्यां एवढेच नियमित व ठराविक उत्पन्न असायला हवे.

- जोवर बरोबरीच्या मान–सम्मानाची नीतिमत्ता व वातावरण समाज स्वीकारत नाहीत तोवर स्त्रिकडे असलेले ज्ञान त्यांच्या आर्थिक सुरक्षेचा पाया बनू शकणार नाही.

## ६. लोकविद्या समाजातील इतर घटकांनी आपल्या ज्ञानाचा दावा कसा मांडावा

- आपल्या देशात मजुरांची संख्या मोठी आहे. रोजंदारी वर काम करणारे मजूर गावो गावी व शहरो शहरी आहेत. सर्वप्रथम, ‘मजूर’ नावाचा घटक हा समाजाला आधुनिक युगाची देणगी आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. या युगात शेती व कारागिरी संपवून मजूर तयार करण्याची प्रक्रिया अस्तित्वात आली. आध ी लोकांना त्यांच्या ज्ञाना पासून विभक्त आणि घरांतून विस्थापित करून बळजबरीने मजूर बनविले गेले आणि मग त्यांना अडाणी ठरविले गेले. भांडवली व्यवस्थेच्या प्रभुत्वाखाली पारिवारिक उद्योग व व्यवसायां मध्ये देखील मजुरी वर आधारलेली उत्पादन पध्दती वाढीस लागली. तरी, आज ही असे सर्व मजूर शेती व कारागिरीचे ज्ञान बाळगून आहेत. मजूर संघटनांनी आपल्या सदस्यांना केवळ

श्रमाचे मजूर समजणे थांबवले पाहिजे व त्यांना ज्ञानी लोकविद्या समाजाचे घटकच मानले पाहिजे. या समाजाबरोबरच त्यांनी ज्ञानाच्या ताकदीवर जगायचे हक्क व सरकारी कर्मचाऱ्यां बरोबरीच्या नियमित व ठराविक उत्पन्नाची मागणी मांडली पाहिजे.

- पर्याय नसल्याने आपले कौटुंबिक व्यवसाय सोडलेल्या युवांची आज मोठी संख्या आहे. या सर्व नौजवानांनी ते जी जी कामे उपजीविकेसाठी करत असतील त्यां साठी सरकारी कर्मचाऱ्यां प्रमाणेच नियमित व ठराविक उत्पन्नाची मागणी केली पाहिजे. आपल्याला जे काही अवगत आहे त्या ज्ञानाच्या बळावर जगायचा हक्क आपल्याला आहे व शासनाने पक्षपाती धोरण सोडून आपल्याला उत्पन्नाची हमी द्यावी, ही मागणी या युवा पिढीने उचलून धरली पाहिजे.

- दूरवर पसरलेल्या गावांत व जंगलांतच नव्हे तर शहरातील अनेक वस्त्यांत देखील लोकांचे आरोग्य रक्षण व वर्धन यां कामात अनेक कार्यकर्ते लागलेले आहेत. या सर्व ठिकाणी सरकारी आरोग्य व्यवस्था एकतर मोडकळीला आलेल्या आहेत किंवा अस्तित्वातच नाहीत. खाजगी आरोग्य व्यवस्थांबद्दल काय बोलावे? तेथे तर पैसा आणि ठकसेनांचा संचार वाढतच चालला आहे. अशा परिस्थितीत लोक अशा आरोग्य कार्यकर्त्यांवरच विसंबून आहेत की ज्यांनी आपले ज्ञान कॉलेज मधून नव्हे तर समाजातूनच गोळा केलेले आहे. या ज्ञानात नैसर्गिक, आयुर्वेदिक, यूनानी अशा पध्दती व औषधींचे ज्ञान आहे. या ज्ञाना बद्दल लोकांत आदरभाव ही आहे. शासन मात्र वैदू, भोंदू अशा शब्दांत या कार्यकर्त्यांची कुचंबणा करते व त्यांच्या कामावर आडकाठी आणि बंदी लावते.



तथाकथित उच्चशिक्षित डॉक्टर आणि आधुनिक वैद्यकीय व्यवस्थांचे ठेकेदार यात शासनाची साथ करतात. या उलट आरोग्य संबंधी लोकविद्येचे धनी असलेल्या या कार्यकर्त्यांना नियमित उत्पन्न देवून प्रोत्साहित करणे, याची गरज आहे. या सर्वांनी आपल्या ज्ञानाच्या बळावर असे उत्पन्न सरकार ने त्यांना, ही मागणी शासनाकडे मांडणे गरजेचे आहे.

- समाजातील कलाकार हे मानवी संवेदना जोपासणारे सर्वात सक्रिय असे घटक होत. विविध प्रकारच्या कला क्षेत्रात निष्णात असे अनेक घटक समाजात आहेत की जे काळाच्या चालीचा वेध घेत आपल्या कलेतून जगण्याचे मर्म व नीतिमूल्ये नवनवीन रूपांत सामाजिक उत्सवांमधून सतत लोकांसमोर मांडत असतात. प्रसंगी समाजात फणा वर काढत असलेल्या पाखंडा चा हे कलाकार वेळोवेळी समाचार तर घेतातच, शिवाय या बरोबरच ते सतत मानवी संवेदना व सामाजिक जाण चेतवतात. गाणारे, वाजवणारे, कथा सांगणारे, नर्तक, नाट्यकार, अभिनय करणारे, सिनेमा कलाकार, चित्रकार अशा सर्वच कलाकारांची आपआपली बिरादरी असते. वेगवेगळ्या कलांचे हे साधक मानवी सभ्यता जोपासण्यात व वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. या सर्वात लोकविद्येवर जगणाऱ्यांची मोठी संख्या आहे. आजच्या बाजारपेठेने यांची मोठी लूटच चालवली आहे. लोककला तर सर्वांना आवडते पण लोककलाकारांच्या आर्थिक–सामाजिक परिस्थितीकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. शासन तर याविषयी कुठल्याही जवाबदारी पासून अलिप्तच राहते. या सर्व कला साधकांनी आपल्यासाठी ठराविक व नियमित उत्पन्नाची मागणी मांडली पाहिजे.

# ज्ञान पंचायत

आजच्या व्यवस्थेत असा कुठलाच मंच नाही, असे कुठलेच स्थान नाही जिथे लोकविद्येत समाविष्ट ज्ञानावर चर्चा होऊ शकेल. अशा मंचाची आज गरज आहे. शेतकरी, आदिवासी, कारागीर, लहान व्यावसायिक आणि महिला त्यांच्या जवळ असलेल्या विस्तृत ज्ञाना बद्दल व त्या ज्ञानाची बाजू घेवून न डळमळता, निर्भयपणे जिथे बोलू शकतील अशा स्थळांची आज निकडीची गरज आहे. अशा मंचा वर लोकविद्या समाजातील लोकांच्या ज्ञानाला मान्यता असेल व त्यांच्या आणि प्राध्यापक–शास्त्रज्ञांच्या ज्ञानात उच्च–नीच हा भेदभाव केला जाणार नाही. 'ज्ञान–पंचायत' ही ती जागा होय, तो मंच होय.

ज्ञान–पंचायत लोकविद्या जन आंदोलनातील एक महत्वाचा दुवा आहे. ज्ञान पंचायत ज्ञानावर चर्चा आणि ज्ञानविषयी प्रश्नांवर सामाजिक मत बनवण्याचे व समन्वयाचे स्थळ आहे. पाच खांबांवर उभे एक झोपडी वजा छत्र ज्ञान पंचायती चे प्रतीक मानलले आहे. हे पाच खांब लोकविद्या समाजाच्या पाच प्रमुख घटकांचे प्रतीक होत. शेतकरी, कारागीर, आदिवासी, लहान व्यावसायिक आणि महिला हे ते पाच घटक होत. ज्ञान पंचायत लोकविद्या समाजाच्या एकीचे व त्यांच्या ज्ञानाचे जिवंत स्थळ होय.

या ज्ञान पंचायतीतून लोकविद्येसाठी विद्यापीठांतील ज्ञाना बरोबर समतेचा हक्क मांडला जातो. लोकविद्या समाजाचे पाचही घटक येथे एकत्र येऊन आपल्या ज्ञानावर चर्चा करतात आणि त्यांचे ज्ञान विद्यापीठांतील ज्ञानापेक्षा कुठेही कमी नाही, हा आत्मविश्वास



जागवतात. गाव–वस्त्या, तालुके व शहरांमध्ये आजवर अशा किती तरी ज्ञान–पंचायती भरल्या आहेत. वाराणसी, दरभंगा, सिंगरौली, इंदोर, मुलताई, नागपूर आणि हैदराबाद या ठिकाणी मोठ्या ज्ञान–पंचायती भरल्या आहेत. या पुस्तिकेत या चर्चांची काही छायाचित्रे शेवटच्या पानांवर छापलेली आहेत.

गावोगावी, वस्त्या–वस्त्यांत, लहान मोठ्या शहरात ज्ञान पंचायती भरवून ही घोषणा करावी की –

- लोकविद्ये च्या क्षमतेवर उपजीविका चालवणे हा माणसा चा जन्मसिध्द हक्क आहे. विकासाच्या नावाने लोकांचा हा हक्क हिरावणे शासनाने बंद करावे.
- ज्याला जे येते त्याच्या बळावर त्याला ठराविक, नियमित आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरी चे उत्पन्न मिळण्याची व्यवस्था करणे हे शासनाचे प्रथम कर्तव्य आहे.

# परिवर्तना चे नवीन तत्त्वज्ञान

लोकविद्या आणि विद्यापीठांतील ज्ञान यांच्यात समता व मैत्री तयार करणे हा लोकविद्या–समाजाच्या उध्दाराच्या मार्गातला एक महत्वाचा टप्पा आहे. जी विद्यापीठांची लोकविद्येकडे बघण्याची दृष्टी, तीच शासनाची लोकविद्या समाजाकडे बघण्याची दृष्टी. ही दृष्टी तिरस्काराने भरलेली आहे. लोकविद्या समाजाला आपले ज्ञान व तत्वज्ञान यांच्या जोरावर या परिस्थितीत बदल घडवण्याचे कार्य पूर्णत्वास न्यायचे आहे. यानेच परिवर्तनाच्या नवीन दृष्टीला योग्य तो संदर्भ लाभतो.

सर्व शेतकरी, कारागीर व आदिवासी आपापल्या समाजांच्या नेतृत्वा बरोबर वेळोवेळी हितगुज करतात. परंतु, आधुनिक शिक्षण संस्थांचे लोक व शासन मात्र या नेतृत्वाच्या म्हणण्याकडे सपशेल दुर्लक्ष करतात. लोकविद्या समाजाचे लोक आपापल्या सामाजिक संस्था व पंचायती–संघटनाकडे आपापल्या प्रश्नांचे समाधान शोधतात. परंतु, आपली धोरणे व कार्यक्रम ठरवतांना शासन मात्र या समाज–संघटनांची मते ध्यानात घेत नाही. लोकविद्येची दृष्टी ही आहे की समाजाचे प्रश्न समाजच सोडवतो आणि हे करता यावे यासाठी सामाजिक ज्ञानाला (लोकविद्येला) इतर प्रतिष्ठित ज्ञान प्रवाहा सारखाच मान असणे आणि समाजाकडे आवश्यक ती साधने असणे गरजेचे आहे. कदाचित एकही असा सामाजिक प्रश्न नाही की ज्याच्या सोडवणुकीसाठी विद्यापीठांतील तज्ञ किंवा भरमसाठ पैशांची गरज असावी.

## जगात पुढे येत असलेले समाज परिवर्तनाचे विचार

वीस वर्षांपूर्वी सर्व जगातील देशांची सरकारे एकत्र आली व त्यांनी



जागतिक व्यापार संघटना स्थापन केली. सर्वच सरकारींनी खाजगीकरण, खुली अर्थव्यवस्था व जागतिकीकरणाची धोरणे स्वीकारली. या घडामोडीनंतर लोकविद्या समाजाचे शोषण नवीन तंत्र व पध्दतींनी सुरू झाले. संपूर्ण लोकविद्या समाज अशा बाजारपेठेच्या कचाट्यात सापडला की जिथे या समाजाचे लोक फक्त लुटले जातात. तेव्हा अस्तित्वात असलेले समाज–परिवर्तनाचे सर्वच विचार या नवीन वातावरणात कुचकामी ठरले. सत्ता व पैशाच्या या नवीन खेळात सर्वसामान्य लोक अधिकच असहाय होत गेले. लोकविद्या समाजाच्या लोकांनी आपल्या बचावासाठी अगणित संघर्ष केले. तरी, हे संघर्ष एकत्र बांधून व्यापक एकी उभारता येईल अशी दृष्टी देण्यात मात्र समाज–परिवर्तनासाठी झटणारे कार्यकर्ते अयशस्वी ठरलेत. लोकविद्या तत्त्वज्ञान ही पोकळी भरता यावी या हेतूनेच प्रपंच आहे.

एवढ्यात अनेक देशांमध्ये तिथल्या संस्कृती व गरजांनुसार असे अनेक विचार पुढे आले आहेत की ज्यांचा मानस समाजात मूलभूत बदल घडवायचा आहे. येथे हे सर्व विचार ध्यानात घेणे योग्यच आहे.

- दूर पश्चिमेकडील बोलिविया आणि इक्वाडोर नावांच्या देशात आदिवासींची बहुसंख्या असलेले समाज आहेत. या देशांनी धरणी माते (Mother Earth) च्या तत्वज्ञानाला आपल्या देशांत पुनर्निर्मितीचा पाया मानले आहे. या परिवर्तनाचे नवीन तत्त्वज्ञानाने त्यांनी आपल्या देशांच्या घटनेत बदल केले आहेत. या तत्त्वज्ञानाने साम्राज्यवादा समोर एका नवीनच पध्दतीने आव्हान उभे केले आहे. एका दृष्टीने निसर्ग आणि धरणी मातेच्या अधिकारांचा विचार पंचतत्वांचे तत्वज्ञानाच आहे. धरणी, पाणी, हवा, अग्नि व आकाश या तत्वांच्या वैचारिक सत्तेची ही समकालीन अभिव्यक्तीच आहे.

- वाया कम्पेसिना नावाच्या शेतकरी व शेतमजुरांच्या जागतिक संघटनेने खाद्य–प्रभुतेचा नवीन विचार मांडला आहे. जगभरच्या साऱ्या देशांतील सरकारे खाद्य सुरक्षेच्या (Food Security) नावा खाली भांडवलशाही ठेकेदारांच्या हातात गरीब लोकांच्या अन्नाची जवाबदारी टाकत आहेत. सर्वांना अन्न पुरवायची जवाबदारी खरे तर अन्न–धान्य उत्पादक ग्रामीण समाजांकडे असायला हवी. यासाठी स्थानिक साधने व संपत्ती वर या समाजाचा हक्क असायला हवा. हाच खाद्य–प्रभुते चा विचार आहे.
- अमेरिका, यूरोप आणि कॅनडा येथील विद्यार्थी गेली काही वर्षे शिक्षणाच्या क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्याच्या नियंत्रणाला विरोध करत आहेत. ज्ञान विद्यापीठांच्या मगरमिठीतून मुक्त व्हावे, असे या आंदोलनाचे म्हणणे आहे. हे विद्यार्थी 'मृत आणि जिवंत ज्ञानाचा विचार' मांडतात. ते विद्यापीठांतील ज्ञानाला मेलेले ज्ञान मानतात व स्वतःला जिवंत ज्ञानाचे पुरस्कर्ते मानतात.
- भारतातील शेतकरी आंदोलने आणि जल–जंगल–जमीन ची आंदोलने लोकविद्या विचार घेऊन लोकविद्या जन आंदोलनाच्या माध्यमातून पुढचे पाऊल उचलायचे प्रयत्न करत आहेत.

लोकविद्या समाजाला कबीर आणि महात्मा गांधी या दोहोंना घेऊन वाटचाल करायची मानसिकता बनवावी लागेल. आधुनिक शिक्षणाने एक नव–ब्राह्मणवाद रूजवला आहे. जन्माने सामाजिक मान ठरवण्याचा प्रकार यात ही आहे. यात लोकविद्या समाजाच्या मुलांना उच्च शिक्षण संस्थां पासून पध्दतशीर पणे दूर सारले जाते. सत्ते बरोबर सरळ ऋणानुबंध असलेले हे ज्ञान समाजातील एका लहानशा भागासाठीच आहे. शिवाय, ते कोणासाठी आहे हे



ही जन्मानेच ठरते, असा हा नवा ब्राह्मणवाद आहे. आधुनिक उच्च शिक्षण घेतलेल्यांना आपल्या शिक्षणाचा अहंकार तर असतोच, शिवाय ते सर्वसामान्य लोकांना आपल्यापेक्षा वेगळे व खालच्या पातळीचे समजतात आणि त्यांचा दंभपूर्ण तिरस्कार करतात. आता तर हा शिक्षित समाज आपल्या बाहेर रोटी–बेटीचा व्यवहार ही करत नाही. त्यांच्या राहण्या, खाण्याच्या व मनोरंजनाच्या जागा ही वेगळ्याच असतात. लोकविद्येचे दमन व शोषण करण्याच्या बाबतीत जुन्या व नवीन ब्राह्मणवादात परस्पर समझोता झालेला आहे. उच्च शिक्षणाचे मुखंड आणि राजा–रियासतदारांत गोड मैत्रीचे संबंध दिसतात. या दोहोंची सामाजिक नीतिमत्ता ही सारखीच दिसते. या युतीशी दोन हाथ करायला सामाजिक परिवर्तनाच्या पुरस्कर्त्यांना नवीन वैचारिक बैठक निर्माण करावी लागेल. लोकविद्या विचार ही बैठक बांधायचे कार्यच होय. कबीर आणि गांधी यांना एकत्र आणायचे असेल तर जुन्या आणि नवीन अशा दोन्ही ब्राह्मणवादांशी संघर्ष करावा लागेल.

# लोकविद्या विचार यात्रा

लोकविद्या ही कल्पना घेवून विचार व कार्याची सुरवात 1995 पासून झाली. वाराणसी येथे हा विचार घेऊन पहिले मोठे सार्वजनिक कार्य नोव्हेंबर 1998 मध्ये 'लोकविद्या महाअधिवेशन' या रूपाने केले गेले. लोकविद्येला प्रतिष्ठा हे घोषित उद्दिष्ट ठरवून 1500 लोकांनी पाच दिवस या महा अधिवेशनात वेगवेगळ्या विषयांवर चर्चेत भाग घेतला. शेतकरी, कारागीर व महिला संघटनांनी आपल्या ज्ञानाचे दावे या कार्यक्रमात मांडले. या नंतर 'लोकविद्या संवाद' या प्रकाशनाच्या माध्यमातून लोकविद्या विचारावर या प्रतिष्ठा मोहीमे ची पुढची वाटचाल होत गेली. 2005 मध्ये वाराणसीला 'विद्या आश्रम' ची स्थापना झाली. विद्या आश्रम ची स्थापना व लोकविद्या कार्य पुढे नेण्यात शेतकरी आन्दोलना चा संदर्भ होता. कार्यकर्त्यांच्या ज्या गटाने हे कार्य केले तो 1980 पासूनच शेतकरी आंदोलनात सक्रिय होता. कारागीर, आदिवासी, लहान व्यावसायिक व महिलांच्या संघर्षात व संघटनात या कार्यकर्त्यांनी भाग घेतला.

माहिती तंत्रज्ञान व इंटरनेट ने एकंदर ज्ञान–जगात माजलेल्या खळबळी चा अर्थ स्पष्टपणे ओळखून 'विद्या आश्रम' ची स्थापना करण्यात आली होती. संघटित ज्ञानाच्या क्षेत्रात 'सायंस' ची सुलतानशाही या खळबळीने संपुष्टात आणली. 1990 आधीच्या कुठल्याही इतर ज्ञान प्रवाहाला ज्ञान म्हणून दर्जा हवा असल्यास 'सायंस' च्या निकषांवर स्वतःची लायकी सिध्द करणे क्रमप्राप्त मानले जात असे. विद्या आश्रमच्या कार्यात हे स्पष्ट झाले की माहिती तंत्रज्ञानाच्या नव्या युगात



या निकषांची सार्वजनिक पातळीवरील मान्यता क्षीण होत चालली आहे. या परिस्थती ने लोकविद्ये साठी प्रतिष्ठा मिळविणे, ज्ञान म्हणून दर्जा मिळविणे व लोकविद्येतील ज्ञानाचा दावा मांडणे यां कार्या साठी ऐतिहासिक संधी उपलब्ध करून दिली आहे, असा लोकविद्या विचार घेवून कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यां चा दृढ मानस झाला.

समाजात ज्ञानावर संवाद साधून आपल्या प्रकाशनांतून व लोकविद्या समाजातील लोकांच्या संघटनां बरोबर काम करून लोकविद्ये चा दावा मांडणे हे कार्य विद्या आश्रम ने सातत्याने सुरू केले. या कार्यक्रमात अगरिया विद्या, नारी विद्या, स्थानिक बाजारपेठ मोहीम, भाईचारा विद्यालय, कारीगर समाज, किसान पीठ, ज्ञान–मुक्ती मंच, लोकविद्या पंचायत आणि ज्ञान पंचायत या मोहीमाच्या पुढाकारा मार्फत 'लोकविद्या जन आंदोलन' हा टप्पा विद्या आश्रम ने गाठला.

लोकविद्या जन आंदोलन चे पहिले आंतर्राष्ट्रीय अधिवेशन विद्या आश्रम परिसरात 12–14 नोव्हेंबर 2011 रोजी भरले. या नंतर बिहार मध्ये दरभंगा (मार्च–एप्रिल 2012), आंध्रप्रदेश मध्ये विजयवाडा (मे, 2012), मध्य प्रदेशात सिंगरौली (सप्टेंबर, 2012) आणि इंदोर (जानेवारी, 2013) येथे क्षेत्रीय संमेलने भरलीत. मार्च 2012 ला सेवाग्राम व फेब्रूवारी 2013 ला मुंबई येथे कार्यकर्त्यांच्या मोठ्या बैठकी झाल्या. या काळात लोकविद्या समन्वय समूह, लोकविद्या मेल–मिलाप, लोकविद्या सत्संग, लोकविद्या ताना–बाना, लोकविद्या भाईचारा विद्यालय, लोकविद्या प्रपंचम, लोकविद्या साधिकार संघटना, लोकविद्या आश्रम आणि लोकविद्या विकी अशा विविध रूपांत ज्ञान आंदोलना चे कार्यक्रम झाले व नवीन विचार पुढे गेला.

जानेवारी 2014 मध्ये मुलताई, मध्य प्रदेश येथे भरलेल्या

लोकविद्या जन आंदोलनाच्या अधिवेशनात जन संघर्षांची ज्ञान–दृष्टी घडवण्याची आग्रही मांडणी झाली. लोकविद्या समाजाच्या संघर्षात ऐक्याचे सूत्र या समाजांचे ज्ञान भांडार म्हणजेच लोकविद्येत आहे असे मानणाऱ्या विचारावर भर टाकण्यात आला. या अधिवेशनाचे घोषणापत्र या पुस्तिकेत पुढे प्रकाशित केलेले आहे. गाव–वस्त्यांत व शहरांत लोकविद्या यात्रांतून घोषणा पत्राातील मुद्यांचा प्रचार करण्यात आला. मार्च–एप्रिल 2014 मध्ये वाराणसी लगतच्या क्षेत्रात शेतकरी–कारागीर पंचायतींतून हे मुद्दे मांडले गेले. मालवा क्षेत्रात ज्ञान पंचायत भरली. 28–29 जून 2014 ला नागपूर येथे भरलेल्या संमेलनात शेतकरी संघटना, कारागिरांच्या संघटना, दलित संघटना व लोकविद्या जन आंदोलनच्या 100 कार्यकर्त्यांनी मुलताई धोषणा पत्रातील मांडणीवर एकमत दर्शवले आणि सर्वांना ठराविक, नियमित व सरकारी कर्मचाऱ्यां एवढे उत्पन्न या मुद्यावर मोहीम उभारण्याचा निर्णय घेतला.

◢ ◢ ◢



# लोकविद्या जन आंदोलन मुलताई संमेलनाचे घोषणापत्र
## (जानेवारी २०१४)

लोकविद्या जन आंदोलन हे अशा लोकांचे ज्ञान आंदोलन आहे की जे स्वतःच्या ज्ञानाच्या बळावर आपले जीवन व समाज घडवतात. शेतकरी, आदिवासी, लहान व्यावसायिक, ठेले–फुटपाथवर चे दुकानदार, विविध प्रकार च्या लहान लहान सेवा पुरवणारे, सर्व प्रकारची डागडुजी करणारे, मासेमार, गवंडी या सर्व कुटुंबातील स्त्रिया हे सर्व लोक एकतर कधी शाळेत गेलेले नसतात किंवा दहावी नंतर शिक्षण सोडावे लागलेले असतात. या सर्वांकडे असलेले ज्ञान हे ते काम करतात तेथे आणि एकंदर सामाजिक जीवनातून त्यांनी मिळवलेले असते. या सर्व ज्ञानालाच लोकविद्या म्हणतात आणि या सर्वांचा समाज म्हणजेच लोकविद्या समाज, देशातील सर्व व्यवस्था फक्त आधुनिक शिक्षण घेतलेल्यां साठीच बनल्या. लोकविद्या समाजासाठी शासनाने काहीही केलेले नाही. उलट या व्यवस्थांतून भांडवलदार आणि कंपन्यांच्या संघमताने लोकविद्या समाजाचे शोषण केले जाते, त्यांना त्यांच्या जगातून विस्थापित केले जाते. सर्वदूर लोकविद्या समाजातील लोक आपले जीवन व साधने वाचविण्या साठी संघर्ष करत आहेत. तर शासन पोलीस व प्रशासनाच्या माध्यमातून त्यांचे दमन करत आहे.

लोकविद्या समाजाचे हे संमेलन संघर्ष करणाऱ्या लोकांची व त्यांच्या संघटनांची एकी उभारायचे मार्ग शोधण्यासाठी भरले आहे.

12 जानेवारी 1998 ला मुलताई येथील शेतकरी आंदोलनात शहीद झालेल्या शेतकऱ्यांच्या स्मृती दिनी शेतकऱ्याकडे अशी कुठली ताकद आहे की जिच्या बळावर लोकविद्या समाजात एकी चा संदेश नेता येईल, या मुद्यावर विस्तृत चर्चा झाली. ही ताकद त्यांच्या ज्ञानाची आहे. शासन, प्रशासन व भांडवलदारांनी आधुनिक शिक्षितां बरोबर संगनमत करून या ज्ञानाला खोटे ठरवण्याचे कारस्थान केले आहे. हे सर्व मिळून अशा विकासाची ओरड माजवतात की ज्याचा पाया विद्यापीठांतील ज्ञानात आहे, आणि ज्या साऱ्या लोकविद्या समाजात हाहाःकार माजवला आहे. जोवर आपण आपल्या ज्ञानाचा हक्क सार्वजनिक पातळीवर मांडत नाही तोवर आपल्या खुशाली चे सर्व रस्ते बंदच राहतील. आपले ज्ञानच आपल्या भरभराटीचे, खुशालीचे सूत्र होय.

## लोकविद्या जन आंदोलना च्या घोषणा

1. लोकविद्येच्या बळावर जगणे हा मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. यासाठी विस्थापन संपूर्णपणे बंद व्हावे आणि शेतकरी, कारागीर व आदिवासी यांच्या उत्पादनांना उचित भाव मिळावेत.
2. ज्ञानाच्या क्षेत्रात उच्च–नीच असा भेदभाव सर्वस्वी अन्यायपूर्ण आहे. लोकविद्येचा मान विद्यापीठांतील ज्ञानाच्या बरोबरीचा असला पाहिजे. यासाठी पहिले पाऊल म्हणून लोकविद्येच्या बळावर जगणाऱ्या सर्वांना सरकारी कर्मचाऱ्यां एवढेच ठराविक व नियमित उत्पन्न मिळाले पाहिजे.
3. राष्ट्रीय संपत्तीचा समान बटवारा झाला पाहिजे. वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य आणि वित्त या सर्व बाबतीत सर्वांसाठी समान व्यवस्था असली पाहिजे.



4. स्थानिक व्यवस्था स्थानिक समाजाच्या नियंत्रणा खाली असल्या पाहिजेत. यासाठी नैसर्गिक साधनांवर स्थानिक समाजांचे नियंत्रण असावे आणि स्थानिक उद्योगांत मोठया भांडवलाच्या शिरकावा वर बंदी असावी.
5. गावो गावी मीडिया शाळा असाव्यात. आपले म्हणणे काय आहे आणि ते कुठे, कोणाकडे व कसे मांडावे या संबंधीचे शिक्षण या शाळांनी ग्रामीण युवकांना द्यावे. परिवर्तनशील जगात समता व खुशाली ने परिपूर्ण जीवन जगण्या करिता या युवकांनी आपसात संवाद साधण्यासाठी कशा व्यवस्था तयार कराव्यात या संबंधी या शाळांमधून सतत विचार केला जाईल.

# लोकविद्या साहित्य सूची (1998 – 2014)

आजवर अनेक प्रकाशनांतून लोकविद्या विचार मांडलेला आहे. या प्रकाशनांची यादी खाली दिलेली आहे. विद्या आश्रम, वाराणसी येथे ही सर्व प्रकाशने उपलब्ध आहेत.

## हिंदी साहित्य

- लोकविद्या विचार (पुस्तक)
- रामअधार गिरी : लोकहित हे प्रहरी (पुस्तक)
- लोकविद्या संवाद (पत्रिका) एकूण 16 अंक, विशेष अंक–कारीगर, किसान, नारी, स्थानीय बाजार, सूचना युग में समाज में ज्ञान पर चर्चा, साहित्य विद्या.
- लोकविद्या पंचायत (पत्रिका) एकूण 17 अंक
- कारीगर नजरिया (वृत्तपत्र)
- लोकविद्या प्रपंचम हलान्ता (तेलुगु वृत्तपत्र)
- ज्ञान की राजनीति पुस्तकमाला : एकूण 5 पुस्तिका – बौध्दिक सत्याग्रह, लोगों के हित की राजनीति और ज्ञान का सवाल, ज्ञान–मुक्ति आवाहन, युवा ज्ञान शिविर, लोकविद्या (मराठी, तेलुगु भाषांत ही उपलब्ध)
- लोकविद्या जन आंदोलन पुस्तकमालाः एकूण 7 पुस्तिका – विस्थापन रोको, बाजार मोडो– लोकविद्या बाजार बनाओ, स्मारिकाः लोकविद्या जन–आंदोलन का प्रथम अधिवेशन 2011, लोकविद्या सत्संग, लोकविद्या जन आंदोलन का बिहार समागम 2012, लोकविद्या जन आन्दोलन का मध्य प्रदेश प्रांतीय अधिवेशन 2012, लोकविद्या जन आन्दोलनः मालवा और निमाड में बढते कदम, जनसंघर्ष और लोकविद्याधर समाज की एकता, सभी की आय पक्की और नियमित हो और यह सरकारी कर्मचारी के बराबर हो (तेलुगु, मराठी, इंग्रजी, उर्दु या भाषांत ही उपलब्ध)



## इंग्रजी साहित्य

- Gandhi's Challenge to Modern Science (Book)
- Lokavidya, Internet and the future of University (Fothcoming Book)
- Bulletins : Dialogues on Knowledge in Society (Four Bulletions) Knowledge in Society, Virtuality and Knowledge in Society, Knowledge Satyagraha, Radical Politics and the Knowledge Question.

**विद्या आश्रम** च्या संकेत स्थळावर (www.vidyaashram.org) बरेच महत्वाचे लेख वाचायला मिळतील. वर दिलेली सर्वच प्रकाशने संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. लोकविद्या जन आंदोलन ब्लॉग www.lokavidyajanandolan. blogspot.com वर वेळोवेळीच्या घटनाकार्यक्रमां संबंधी माहिती मिळू शकेल. लोकविद्या विकी http:// lokavidyawiki.dynamic-dns.net/ वर लोकविद्या विचार/शब्दावली व विविध कल्पनांचे अर्थ थोडक्यात दिलेले आहेत.



फेब्रूवारी 2011: लोकविद्या जन आन्दोलन प्रथम अधिवेशनाच्या हैदराबाद तयारी बैठकीत बोलताना जे.के.सुरेश

नोव्हेंबर 2011: लोकविद्या जन आन्दोलन, प्रथम अधिवेशना च्या उद्घाटन सत्राचे संचालन करताना मंचावर दिलीप कुमार दिली, उजवीकडे कृष्णराजुलू, राजपाल शर्मा








मार्च 2012: लोजआ च्या समन्वय समिती ची सेवाग्रम बैठक (डावीकडे), सप्टेंबर 2012: लोजआ क्षेत्रीय संमेलन, सिंगरौली




लोकविद्या जन आन्दोलन





लोकविद्या जन आन्दोलन



लोकविद्या जन आन्दोलन

लोकविद्या जन आन्दोलन





लोकविद्या जन आन्दोलन

# लोकविद्या जन आंदोलन संपर्क

## ठिकठिकाण चे सक्रिय कार्यकर्ते

**वाराणसी** : प्रेमलता सिंह (9369124998), दिलीपकुमार 'दिली' (9452824380), लक्ष्मण प्रसाद, शिवमूरत राजभर, एहसान आली, कृष्ण कुमार, सुनील सहस्रबुध्दे, बबलू कुमार.

**इंदोर** : संजीव दाजी (9926426858), मगन सिंह बघेल, मोहन सिंह सोलंकी, मंगला हार्डिया,
सुषमा यादव, राजू जामोद, सुमेर सिंह राठौर, शेर सिंह जाधव, राजेश सिसोदिया, कैलाश
सूर्यवंशी, इंदर सिंह राठौर, दब्बू प्रजापति.

**नागपूर** : गिरीश सहस्त्रबुद्धे (ljamaharashtra@gmail.com, 9422559348), विलास भोंगाडे (9890336873).

**वर्धा** : विजय जावंधिया (9421727998)

विदर्भ : प्रह्लाद गावंडे (यवतमाळ), गोपाल रायपुरे (चंद्रपूर), समीक्षा व वासंती सरदार (भंडारा)

पुणे : के. के. सुरेन्द्रन् (k.k.surendran@gmail.com, 020–27298293), स्वाती कीर्तने, तेजश्री

मुम्बई : वीणा देवस्थळी (9820924812), नीरजा (9892017273)

कोल्हापूर : अशोक जाधव

हैदराबाद : बी. कृष्णराजुलू (9866139031), नारायण राव (9849389550), ललित कुमार कौल, रामाराव,
अप्पाराव, अभिजित मित्रा, नरेश कुमार शर्मा

चिराला : मोहन राव (9441041266), वीर नागेश्वर राव



बंगळूरू : जे. के. सुरेश (9845068404), जी. शिवरामकृष्णन्

दिल्ली : अविनाश झा (9911145045), जगनारायण महतो, अशोक रस्तोगी, मोहिनी मलिक, विजय जोशी

सिंगरौली : अवधकश कुमार (9425013524), रवि शेखर (8225935420), एकता, लक्ष्मीचंद दुबे, मंजु सिंह

दरभंगा : चंद्रवीर नारायण

कोलकाता : जितेन नंदी (033–24913666), शमिक सरकार, अशोक चट्टोपाध्याय, पार्थसारथी राय

अमेरिका : अमित बसोले (abasole@gmail.com), शिल्पी जुनेजा (बॉस्टन)

यूरोप : जिगी रोजरो (conricerca@hotmail.com, इटली),
लीना दोकुजोविक (aniliname@yahoo.com, ऑस्ट्रिया / क्रोएशिया), हाना वर्नर (hanna_werner@gmx.de, जर्मनी)

**प्रमुख कार्यालय : विद्या आश्रम, सारनाथ, वाराणसी**

**संयोजक : चित्रा सहस्रबुद्धे** (9838944822),

◢ ◢ ◢